# धरण

बाई मी धरण, धरण, धरण बांधिते,
माझं मरण, मरण, मरण कांडिते ग ॥धृ॥
झुंजमुंज ग झालं, पीठ जात्यात आटलं,
कणी कोंडा गं, कोंडा गं, कोंडा मी रांधिते।
बाई मी धरण...॥१॥

दिस कासऱ्याला आला, जीव मागं घोटळला
तान्हं लेकरु, पाटीखाली, पाटीखाली डालते।
बाई मी धरण...॥२॥

काय सांगू उन्याच्या झळा, घाव खाली फुटे शिळा
कढ दाटे गं, पायाला पाला मी बांधिते।
बाई मी धरण...॥३॥

पेरा पेरात साखर, तुमचं पिकलं गं शिवार
घोटभर पाण्यासाठी, पाण्यासाठी सारं रान धुंडाळीते।
बाई मी धरण...॥४॥

येल मांडवाला चढे, माझ्या घामाचं गं अळे
माझ्या अंगणी, अंगणी पाचोळा ग पडे।
बाई मी धरण...॥५॥

– दया पवार